आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

२२डिसेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- कुवैतच्या विकासात आणि भारत-कुवैत संबंध मजबूत करण्यात भारतीयांचा मोठा वाटा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर

- पोषणयुक्त तांदळावरील कराचा दर कमी करण्याची जीएसटी परिषदेची शिफारस

**आणि**

- पुढच्या वर्षी होणाऱ्या कनिष्ठ गट नेमबाजी विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद भारताकडे

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कालपासून कुवेतच्या दौऱ्यावर आहेत. कुवेतच्या बायन पॅलेसमध्ये औपचारिक स्वागतानंतर प्रधानमंत्री आज कुवेतचे अमीर आणि राजपुत्र यांच्याबरोबर स्वतंत्र बैठका घेणार आहेत. कुवेतच्या प्रधानमंत्र्यांशी ते शिष्टमंडळ स्तरावरही चर्चा करतील. गेल्या ४३ वर्षांतील भारतीय प्रधानमंत्र्यांची ही पहिलीच कुवेत भेट आहे. कुवेतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जबेर अल-सबाह यांच्या निमंत्रणावरून त्यांचा हा दौरा होत आहे.

काल प्रधानमंत्र्यांनी कुवेतमध्ये 'हाला मोदी' या विशेष कार्यक्रमात भारतीय समुदायाच्या मेळाव्याला संबोधित केलं.  कुवेतच्या विकासात आणि भारत-

कुवेत संबंध मजबूत करण्यात भारतीयांचा मोठा वाटा असल्याचं त्यांनी म्हटलं. पुढील महिन्यात आयोजित प्रवासी भारतीय दिवस आणि महाकुंभ मेळ्यात सहभागी होण्याचं आमंत्रण त्यांनी भारतीय समुदायाला दिलं. यावेळी प्रधानमंत्र्यांनी कुवेतमधल्या मिना अब्दुल्लैश भागातल्या कामगार शिबिराला भेट देऊन गेल्या दहा वर्षांत भारत सरकारने सुरू केलेल्या कल्याणकारी योजनांबाबत भारतीय कामगारांशी चर्चा केली. या शिबिरात भारतातल्या विविध राज्यातले सुमारे दीड हजार कामगार आहेत. प्रधानमंत्र्यानी १०१ वर्षीय भारतीय परराष्ट्र सेवेतले माजी अधिकारी मंगल सैन हांडा यांचीही भेट घेतली. कुवेतमध्ये २६व्या अरेबियन गल्फ कपच्या उद्घाटन सोहळ्यालाही प्रधानमंत्री प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांनी कुवेतच्या नेत्यांशी अनौपचारिक चर्चाही केली.

<><><><><>

देशभरात विविध सरकारी मंत्रालये आणि विभागांमध्ये नवनियुक्त ७१ हजारांहून अधिक उमेदवारांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या दूरदृश्य प्रणालीद्वारे नियुक्तीपत्र प्रदान करणार आहेत. देशभरातल्या ४५ ठिकाणी या कार्यक्रमाचं आयोजन होणार असून प्रधानमंत्री उपस्थितांना संबोधित करतील.

<><><><><>

भारतातल्या पहिल्या बायो-बिटूमेन सामग्रीचा वापर करून बांधलेल्या नागपूर- मनसर बायपास महामार्गाचं उद्घाटन केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नीतिन गडकरी यांच्या हस्ते काल करण्यात आलं. बिटुमेन सारख्या

सामग्रीचा वापर करून बांधलेल्या पर्यावरणपूरक रस्त्यांमुळे रस्तेबांधणीचा खर्च कमी होईल तसंच रोजगार निर्मितीला चालना मिळेल, तसंच प्रदूषणालाही आळा बसेल असं प्रतिपादन गडकरी यांनी यावेळी केलं. पिकांच्या अवशेषांपासून तयार झालेल्या बिटुमेनच्या वापरापासूनपासून निर्मित हा देशातला पहिला महामार्ग असून तो पारंपरिक डांबरी रस्त्यापेक्षा ४० टक्क्यांनी मजबूत असल्याचंही त्यांनी नमूद केलं. नागपूर मनसर राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पातही डांबरामध्ये बायो बिटुमेनचे 15 टक्के मिश्रण करून एक किलोमीटर लांबीचा रस्ता तयार करण्यात आल्याचीं माहिती गडकरी यांनी दिली. या रस्त्याचं काम केंद्रीय रस्ते संशोधन संस्था आणि पुण्याच्या बॉयोटेक फर्म प्राज उद्योगसमूहाच्या सहकार्यानं बांधण्यात आला आहे. यावेळी जैवनैसर्गिकवायू सारख्या अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा वापर करून शेतकऱ्यांनी कृषी कचरा आणि बांबूपासून जैवनैसर्गिक वायू तयार करण्याचं आवाहनही गडकरी यांनी केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाचं खातेवाटप काल जाहीर झालं. गृह आणि ऊर्जा खातं तसंच विधी आणि न्याय, सामान्य प्रशासन, माहिती आणि जनसंपर्क खातं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे ठेवलं असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना वित्त आणि नियोजन तसंच राज्य उत्पादन शुल्क खातं तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नगरविकास, गृहनिर्माण आणि सार्वजनिक बांधकाम खाते (सार्वजनिक उपक्रम) देण्यात आलं आहे. जलसंपदा विभागाची जबाबदारी राधाकृष्ण विखे पाटील आणि गिरीश

महाजन यांच्याकडे विभागून देण्यात आली आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांना महसूल विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे.

हसन मुश्रीफ यांना वैद्यकीय शिक्षण,
उदय सामंत यांना उद्योग आणि मराठी भाषा,
गिरीश महाजन यांना आपत्ती व्यवस्थापन,
चंद्रकांत पाटील यांना उच्च आणि तंत्रशिक्षण तसंच संसदीय कार्य विभाग,
गुलाबराव पाटील यांना स्वच्छता आणि पाणीपुरवठा,
अदिती तटकरे यांना महिला आणि बालकल्याण,
गणेश नाईक यांना वनविभाग,
माणिकराव कोकाटे यांना कृषी,
प्रकाश आबिटकर यांना सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण,
जयकुमार गोरे यांना ग्रामीण विकास आणि पंचायत राज,
दादा भुसे यांना शालेय शिक्षण,
संजय राठोड यांना मृदा आणि जलसंधारण,

शंभुराज देसाई यांना पर्यटन,
नितेश राणे यांना बंदरे आणि मत्स्यव्यवसाय,
दत्ता भरणे यांंना क्रीडा आणि युवक कल्याण तसंच अल्पसंख्याक विकास,
तर शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना सार्वजनिक बांधकाम खातं (सार्वजनिक उपक्रम वगळून) देण्यात आलं आहे.

मंगलप्रभात लोढा यांना कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता,

जयकुमार रावल यांना पणन आणि राजशिष्टाचार तसंच आदिवासी विकास,

शंभूराज देसाई यांना खनिकर्म आणि माजी सैनिक कल्याण मंत्रालय,

तर आशिष शेलार हे माहिती आणि तंत्रज्ञान, सांस्कृतिक खात्याचे
मंत्री असतील.

धनंजय मुंडे यांना अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण,

पंकजा मुंडे यांना पर्यावरण, वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन,

अतुल सावे यांना इतर मागासवर्गीय तसंच बहुजन कल्याण आणि दुग्धविकास, अपारंपरिक उर्जा

अशोक उईके यांच्याकडे आदिवासी विकास,

नरहरी झिरवाळ यांच्याकडे अन्न आणि औषध प्रशासन, विशेष सहाय्य

संजय सावकारे यांच्याकडे वस्त्रोद्योग,

संजय शिरसाट यांच्याकडे सामाजिक न्याय विभाग,

प्रताप सरनाईक यांच्याकडे परिवहन, भरत गोगावले यांच्याकडे रोजगार हमी, फलोत्पादन, खारभूमी विकास खातं देण्यात आलं आहे.

मकरंद जाधव यांच्याकडे मदत आणि पुनर्वसन,

आकाश फुंडकर यांच्याकडे कामगार आणि बाबासाहेब पाटील यांच्याकडे सहकार खातं देण्यात आलं आहे.

**<><><><><>**

जीएसटी परिषदेनं पोषणयुक्त तांदळावरील कराचा दर कमी करून पाच टक्के करण्याची आणि पाकिटबंद तसंच लेबल केलेल्या वस्तूंच्या व्याख्येत सुधारणा करण्याची शिफारस केली आहे. वस्तू आणि सेवा कर परिषदेची ५५वी बैठक काल राजस्थानमध्ये जैसलमेर इथं झाली. वस्तू आणि सेवा कराशी संबंधित अनेक निर्णय या बैठकीत घेण्यात आले. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री आणि वित्त मंत्रालयाचे अधिकारी सहभागी झाले होते. बैठकीनंतर बातमीदारांशी बोलताना सीतारामन म्हणाल्या की जीन थेरपीला जीएसटीमधून सूट देण्यात आली आहे. तसंच, दंड आकारणी, बँका आणि गैर-बँकींग वित्त संस्थांच्या विलंबित भरणा शुल्कावर जीएसटी लावला जाणार नाही. राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेच्या प्रशिक्षण भागीदारांना जीएसटीमधून सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, परंतु अधिसूचना जारी झाल्यानंतर या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल असंही सीतारामन यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

केंद्रीय क्रीडा मंत्री मनसख मांडविय यांनी आज केंद्रीय राखीव पोलीस दल आणि भारत- तिबेट सीमा पोलिस दलाच्या जवानांसोबत आज नवी दिल्लीत फिट इंडिया सायकल मोहिमेत भाग घेतला. मांडविया यांनी मेजर ध्यानचंद नॅशनल स्टेडियम ते रायसीना हिलपर्यंत सैनिकांसोबत सायकल चालवली. देशभरात अकराशेहून अधिक ठिकाणी या मोहिमेचे आयोजन करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. सायकलिंग हा सर्वोत्तम व्यायाम असून या

उपक्रमात जास्तीत जास्त लोकांनी यात सहभागी व्हावं असं आवाहन मांडविया यांनी केले.

<><><><><>

पंजाबमधल्या मोहाली इथं काल रात्री तीन मजली इमारत कोसळून दोन जणांचा मृत्यू झाला. अद्यापही ढिगाऱ्याखाली १३ जण अडकल्याची भीती व्यक्त केली जात असून लष्कर, एनडीआरएफ  आणि पंजाब पोलिसांद्वारे मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. वैद्यकीय पथकं घटनास्थळी उपस्थित असून आजूबाजूच्या सर्व रुग्णालयांना सज्जतेची सूचना देण्यात आली आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंतसिंह मान मोहाली प्रशासनाच्या संपर्कात असून परिस्थितीवर ते लक्ष ठेवून आहेत.

<><><><><>

जर्मनीत मॅग्डेबर्ग इथं झालेल्या भीषण हल्ल्याचा भारतानं तीव्र निषेध केला आहे. या हल्ल्यात पाच लोक ठार तर दोनशेहून अधिक लोक जखमी झाल्याचं वृत्त आहे. जखमींमध्ये सात भारतीयांचाही समावेश होता. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं या संदर्भात जारी केलेल्या निवेदनात, नाताळच्या बाजारात झालेला हा हल्ला भीषण आणि माथेफिरू असल्याचं म्हटलं आहे. जखमी भारतीय नागरिकांवर रुग्णालयात उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आलं असल्याचं सुत्रांनी सांगितलं आहे. जर्मनीतील भारतीय दुतावास या हल्ल्यात झालेल्या जखमी झालेल्यांच्या संपर्कात असल्याचही निवेदनात म्हटलं आहे. नाताळाच्या खरेदीसाठी गर्दी केलेल्या बाजारात कार घुसवून शुक्रवारी हा हल्ला झाला होता.

**<><><><><>**

भारत पुढल्या वर्षी कनिष्ठ गट नेमबाजी विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद भूषवणार आहे. भारत प्रथमच या स्पर्धेचं यजमानपद भूषवणार असून पुढल्या वर्षाच्या उत्तरार्धात ही स्पर्धा होईल. भारतीय राष्ट्रीय रायफल संघ ही स्पर्धा आयोजित करणार असून यात रायफल, पिस्तूल आणि शॉटगन प्रकारात स्पर्धा होतील. गेल्या दशकभरात भारतात आयोजित ही नववी मोठी नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धा आहे. यापूर्वी भारतानं आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघाच्या सहा स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

**<><><><><>**

भारतानं १९ वर्षांखालील मुलींच्या आशिया चषक क्रिकेट टी- ट्वेंटी स्पर्धेच्या अंतिम लढतीत बांग्लादेशला ४१ धावांनी पराभूत करत विजेतेपद पटकवलं आहे. मलेशियातल्या क्वालालंपूर इथं आज सकाळी झालेल्या या सामन्यात, बांग्लादेशनं नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी केली. भारतानं वीस षटकांत सात बाद ११७ धावा केल्या. प्रत्युत्तरात बांग्लादेशचा डाव एकोणीसाव्या षटकाचे तीन चेंडु शिल्लक असतांना सर्वबाद ७६ धावांवरच आटोपला.

**//<><><><><>//**